
श्री ब्रह्मचैतन्य महाराज
गोंदवलेकर
प्रवचने

# श्रीक्षेत्र गोंदवले

गोंदवले बुद्रुक अथवा "थोरले गोंदवले" हे गाव सातारा-पंढरपूर रस्त्यावर साताऱ्यापासून ६४ किलोमीटर अंतरावर आहे. पुण्याहून सासवड-फलटणमार्गे गोंदवल्यास थेट जाणाऱ्या स्टेट ट्रान्स्पोर्ट बसेस आहेत. तसेच मुंबई, वसई, ठाणे, कराड, विटे, सांगली, सोलापूर, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट वगैरे ठिकाणांहून येणाऱ्या बससेवा आहेत. याखेरीज दहीवडीस बदली केल्यास दहीवडीस अन्य अनेक ठिकाणांहून बसगाड्या उपलब्ध आहेत. दहीवडी-गोंदवले बुद्रुक अंतर ५ किलोमीटर असून बससेवा तसेच रिक्शासेवाही विपुल प्रमाणात आहे. आगगाडीने येणे असेल तर कोरेगाव स्टेशन सोयीचे. तेथून तेथील एस्.टी.स्टँड २ किलोमीटर आहे, तेथून दहीवडी/गोंदवले येथे जाण्यास बसची सोय आहे.

श्रीसमाधीमंदिर गोंदवले बस स्टँडपासून २०० मीटर अंतरावर आहे. समाधी तळघरात असून तिच्या वरच्या मजल्यावर श्रीगोपालकृष्णाची मूर्ती आहे. याच परिसरात श्रीआईसाहेबांचे मंदिर, नाममंदिर, गोशाळा, उतरण्यासाठी खोल्या, स्वयंपाकघर वगैरे वास्तूही आहेत.

श्रीसमाधिमंदिरात पहाटे भूपाळ्या, काकड आरती, त्रिकाळ पूजा, अभिषेक, नामजप, विष्णुसहस्रनाम आदि स्तोत्रे, पंचपदी भजन, शेजारती, असा नित्योपासना कार्यक्रम असतो. याखेरीज श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी, व दासनवमी हे उत्सव नामजपसप्ताहासह साजरे होतात. पुण्यतिथिउत्सव मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असतो. दशमीस पहाटे ५-५० वाजता निर्याणकाल साजरा होतो.

गोंदवले गावात श्रीमहाराजांची जन्माची व राहण्याची वास्तू आहे, व 'थोरले' राममंदिर, 'धाकटे' राममंदिर, दत्तमंदिर, शनिमंदिर, ही त्यांनी स्थापन केलेली मंदिरे आहेत. या सर्व वास्तूंची मालकी श्रीमहाराजांच्या व्यवस्थापत्राप्रमाणे नेमलेल्या विश्वस्तांकडे आहे.

श्रीमहाराजांचे आजोबांना दृष्टांत होऊन मिळालेल्या श्रीविठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती त्याच आवारात आहेत.




अहमदनगर
नाशिककडे
बीड
परळीकडे
लोणावळा
शिरुर
जामखेड
पुणे
दौंड
सासवड
लातूरकडे
बार्शी
लोणंद
फलटण
कुर्डुवाडी
महाबळेश्वर
दहीवडी
गोंदवले
सातारा
कोरेगांव
म्हसवड
पंढरपूर
सोलापूर
चिपळूण
पाटण
रत्नागिरीकडे
कऱ्हाड
विटे
विजापूरकडे
सांगली
मिरज
विजापूरकडे
बंगलोरकडे
म्हैसूर राज्य
कोल्हापूर



श्री थोरले राम - श्रीक्षेत्र गोंदवले





श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर



श्रींची समाधी - श्रीक्षेत्र गोंदवले

॥ श्रीराम ॥

## श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांची प्रवचने

''नवीन नवीन शोध लागत आहेत आणि त्यामुळें नवीन सोयी होत आहेत. पण त्यामुळें मनुष्य खरोखर सुखी झाला आहे काय ? साहेबाच्या नव्या शोधानें मनुष्याच्या देहाला सुख मिळेल, पण खरें सुख मनाच्या अवस्थेवरच अवलंबून असल्यानें असे शोध कितीहि लागले तरी मनुष्य खरा सुखी होणार नाहीं. देहाला सर्वस्व मानून व त्याला सुखांत ठेवण्याच्या नादीं लागून आत्म्याची कुचंबणा करणें हें आत्मघाताचें लक्षण आहे. प्रत्येकानें-निदान ज्याला प्रपंचांत पुरेंसें मिळत आहे त्यानें-आहे त्या परिस्थितींत समाधान मानून आपलें लक्ष भगवंताकडे वळविलें आणि आपला काल त्याच्या नामांत घालविला तर जगांतील द्वेष, मत्सर, लोभ, क्षोभ, पुष्कळ कमी होतील व सामान्य मनुष्य सुखी राहील. मनुष्य भेटला कीं तो सुखी किती आहे हें मीं पाहतों, इतर त्याच्या गोष्टी मी पाहात नाहीं. पण तुम्ही श्रीमंती, विद्या, मान यांवरून तो सुखी ठरवितां ! भगवंतावांचून मनुष्य कसा सुखी होईल ? प्रपंची माणसाच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे. ही जाणीव ठेवून मी तुम्हांला खात्रीनें सांगतों कीं, प्रपंचांतील कर्तव्यकर्में करीत असतां भगवंताच्या नामांत राहा, राम तुमच्यावर कृपा केल्याशिवाय राहणार नाहीं.''

- जीवनांत खरें समाधान कसें लाभेल ?
- रोजच्या व्यवहारांत प्रपंचाच्या घडामोडींत भगवंताचें अनुसंधान कसें ठेवावें ?
- मनुष्यजन्माचें निश्चित ध्येय काय आहे व तें साध्य करून घेण्यास कोणतें साधन करावें ?
- स्वतःच स्वतःचा उद्धार कसा करून घ्यावा ?
- भगवंताचें नाम घ्यावें म्हणजे काय करावें ?

या सर्व प्रश्नांचें अत्यंत घरगुती, व्यवहारी, सहजसुंदर व भगवंताच्या प्रेमानें ओथंबून भरलेल्या भाषाशैलींत केलेलें विवेचन, म्हणजे भगवंतावर अकृत्रिम व निष्काम प्रेम करून तदाकार होऊन राहिलेल्या श्रीसच्चिदानंदस्वरूप महात्म्याचे अमृतमय बोलच !

॥ श्रीराम जयराम जयजय राम ॥